# बाप

'बाप' या शब्दाचा अर्थ म्हणजे जो आपल्या घराचा सांभाळ करतो. घरात लागणाऱ्या जरूरीच्या वस्तु पुरवण्याचा प्रयत्न करत असतो. घरावर देखरेख ठेवणारा माणूस म्हणजे आपले बाबा त्याच्यावर घराची खूप मोठी जबाबदारी असते. तो आपल्या घरात कशी शांतता निर्माण होईल याचा प्रयत्न करत असतो. तो कसातरी घर चालवण्याचा प्रयत्न करत असतो. पण तो या हलाखीतून जात असताना तरी त्याच्या पाठीमागे उभे राहणारे त्याची मुले त्याच्या मनासारखे वागत नाही. त्यांना फक्त मुलाकडून प्रेमाची आशा असते. त्यांना जर आपल्या मुलाकडून प्रेम मिळाल तर त्याची आयुष्यभराची कमावलेली पुंजी सफल होईल अशी त्याची आशा असते.

'अरे! आपल्यासाठी दिवसरात्र कष्ट करणारा त्या वडिलाचे ऋण एका मिनिटात फेडून टाकतो. बापाइतकी घराची काळजी घेणारा जगात कोणीच नसेल आणि तुम्ही जगात पहिले स्थान आईला देतात आणि दूसरे स्थान गुरुला मग काय बापाचे तिसरे स्थान येते. जिकडे बघावे तिकडे आईची महती गायली जाते किंवा गुरुजनाची महत्त्व पटवून दिले जाते पण कधी बापाविषयी कोणी माहिती सांगत का? असे का होते, मला तुम्हाला एक प्रश्न विचारावेसे वाटते तो काय माणूस नाही? सर्वात जास्त काम करणारा असून सुद्धा त्याच्यावर इतका अन्याय का केला जातो. त्याला पण मन असते.

जेव्हा आपला मुलगा आजारी पडतो किंवा त्याला काही लागते तेव्हा आईला कशा वेदना होतात तेवढ्याच वेदना बापाला ही होतात पण दाखवत नाही. मनातल्या मनात धुसमत असतो. आईचे दु:ख जाणून येते पण बापाचे दु:ख जाणून येत नाही. तो नुसता मनातल्या मनात रडत असतो. कोणाला ही आपल्या दु:खाची जाणीव होऊ देत नाही. कारण त्याला माहित असते की आपण खचलो तर घरातील माणसाना कोण सावरणार? आपणच निभर्यपणे उभे राहिले पाहिजे. पुन्हा एकदा नविन जीवनाची सुरूवात करतो. त्याच्याशिवाय जगात कोणीच एवढा सहनशील व्यक्ती नव्हे.

जेव्हा आपल्या मुलीचे लग्न असेल तर तो मंडपाच्या बाहेरच पाहूण्याचे स्वागत करत उभा राहतो. त्यांना काय पाहिजे काय नाही सगळीकडे व्यवस्थीत चालू आहे का नाही कारण आपल्या मुलीचे लग्न असते. कोणी नाव ठेवून नये की म्हणून रात्रंदिवस तोच विचार त्याच्या मनात असतात. मुलीचे लग्न सुरळीत कसे पार पडेल हा विचार सदैव त्याच्या मनात असतो.

आई तर त्याच्या मुलाला नऊ महिने आपल्या पोटात वाढवत असे पण बाप आयुष्यभर वाढवत असते. त्याच्यावर संस्कार करत असतो. त्याला शिकवून मोठा करतो. त्याच्या पायावर उभा करतो. नंतर मुलगाच आपल्या बापाला सोडून दूसरीकडे निघून जातो तेव्हा आईपेक्षा बापाला जास्त दु:ख होत असते. बापाने त्याच्याकडून जी आशा केलेली असते ती धूळीला मिळते. असे त्याने कोणते पाप केलेले असते? एवढेच ना त्यानी तुम्हाला लहानच मोठे बनवलेले असते एवढीच त्याची चूकी असते. त्याच्या चुकीची शिक्षा म्हणून शेवटच्या क्षणात बाप आणि लेकामध्ये ताटातुट याची जाण मुल ठेवत नाही आणि मुली घर सोडून दुसऱ्या घरी निघून जाते.

असे म्हणतात की मुलगा लग्न झाल्यानंतर एकाच घराचे नात कायम ठेवतो पण मुलगी दोन घराचे नातं सांभाळत असते. आयुष्यभर आपल्या आई-वडीलांची काळजी घेत असते. मुलगा आयुष्यभर दु:ख देत असतो आणि मुलगी आयुष्यभर सुख देत असते.

मला काय असे म्हणायची नाही की आई श्रेष्ठ नाही. आई तर देवाच्या समान असते. गुरूजन आपल्या विद्यार्थ्याचा विकास करत असते. गुरूजन आपल्या विद्यार्थ्याचा विकास करत असता आणि बाप आपल्या मुलाला पुढे जाण्याचे प्रोत्साहन देत असतो. त्याला पण वाटते आपला मुलगा मोठा होऊन आपले नाव उंचवावे. तुम्ही जेवढा आईचा आणि गुरुचा आदर करतात तेवढाच आपल्या वडिलांचा आदर केला पाहिजे.

वडिलांचे लिहावे तितके कमीच आहे मला तर माझे वडील मला खूप आठवतात. तुम्हाला तुमचे वडील आठवतात की नाही ते मला माहित नाही. आम्ही सगळे त्याच्या सुखात - दु:खात सहभागी होत असतो आणि तुम्हाला पण विनवणी करते की तुम्ही पण आपल्या आई वडीलाच्या सुखा - दु:खात सहभागी होताना बघा मग कसे हसत खेळत जीवन निघून जाते.

***